# BALTIMORE MARATHI MANDAL

बाल्टिमोर मराठी मंडळ

जे खळांची व्यंकटी सांडो |
तया सत्कर्मी रती वाढो |
भूतां परस्परे जडो |
# मैत्र
जीवाचें ||




## बाल्टिमोर मराठी मंडळ

२०१९ अंक १

## संपादकीय

**मैत्र संपादक मंडळ २०१९**

अवंती करंदीकर
रोहित कोल्हटकर
विदुला कोल्हटकर
अनिल मायभाटे
वरदा वैद्य

**बाममं कार्यकारिणी २०१९**

**अध्यक्ष**
प्राजक्ता द्रविड
**उपाध्यक्ष**
सुधीन बेंगेरी
**उपाध्यक्ष- विपणन**
विनी रेगे
**चिटणीस**
गौरी टर्नर
**खजिनदार**
साम्राज्ञी शिंदे
**सह-खजिनदार**
प्राजक्ता पुरोहित

नमस्कार मंडळी!

वसंत वनांत जनांत हांसे । सृष्टीदेवी जणू नाचे उल्हासें ।
गातात संगीत पृथ्वीचे भाट । चैत्र–वैशाखाचा ऐसा हा थाट ।
भारती सृष्टीचे सौंदर्य खेळे । दावीत सतत रूप आगळे ।।

सृष्टीचे सौंदर्य चैत्रात नवचैतन्याने बहरते, मग ती भारती सृष्टी असो वा अमेरिकी सृष्टी. निसर्गाची श्रीमंती पाहून "देईल तो सहस्रकरांनी, घेशील किती दोन हातांनी" अशी आपली अवस्था होते. जागोजागी फुललेले ताटवे, फुलांनी डंवरलेली झाडे मन प्रसन्न करतात. ह्या नवीन बहरासोबत मराठी जनता नवीन वर्षाचे गुढी उभारून स्वागत करते, मग ती जगाच्या पाठीवर कुठेही का असेना! आपला मराठीपणा हा आपल्या जगण्याचा एक अनन्यसाधारण भाग असतो. रोजच्या जीवनात हा संदर्भ वैयक्तिक, घरापुरता, किंवा "घरी" फोन करून आई–वडिलांशी बोलण्याएवढाच उरला असला, तरी तो पुरेसा नसतो आणि म्हणूनच आपण मराठी मंडळाच्या निमित्ताने एकत्र येतो. आपल्या जगण्यातले मराठीपणाचे, भारतीय असण्याचे सार्वजनिक संदर्भ पुन्हा जोडू पाहतो. मराठी मनाला मराठी लेखन–वाचनाची, दिवाळी अंकांची, नाटकांची जात्याच ओढ असते. बाल्टिमोर परिसरात काही वर्षांपासून राहात असलेल्या मित्रमंडळींना "मैत्र"चे अंक वाचल्याची, अंकासाठी लेखन केल्याची आठवण असेलच.

गुढीपाडव्याचा मुहूर्त साधून नूतन "मैत्र"चा पहिला अंक प्रकाशित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. दर तीन महिन्यांनी अंक प्रकाशित करण्याची सध्याची योजना आहे. ललित, माहितीपर आणि वैचारिक लेख, अनुभव, प्रवास वर्णन, कविता, मुलाखत वगैरे विविध लेखनप्रकार हाताळू शकणारी प्रतिभावान मंडळी इथे आहेत ह्याची आम्हाला खात्री आहे. रेखाचित्रे, छायाचित्रे, छंद–कलाचित्रांचेही अंकात स्वागतच आहे. पुढे प्रकाशित होणाऱ्या अंकांसाठी तुमचे साहित्य editor@baltimoremarathimandal.org ह्या पत्त्यावर जरूर पाठवा.

बाल्टिमोर परिसरात राहणारी मराठी मंडळी महाराष्ट्राच्या आणि भारताच्या विविध प्रांतांमधून इथे आली आहेत. आपले लहानपण जिथे गेले त्या परिसराला आपल्या मनांत, आपल्या आठवणींमध्ये नेहमीच एक खास जागा असते. त्याच परिसरात वाढलेली, वावरलेली, तिथले संदर्भ, जागा, वैशिष्ट्ये माहीत असलेली दुसरी व्यक्ती भेटली की ही जागा सुखावते, भूतकाळात रमते. तर अशा लोकांची एकमेकांशी ओळख व्हावी म्हणून एका परिसरातून आलेल्या काही व्यक्तींचा परिचय दर अंकातून करून देण्याची कल्पना "गड्या आपला गाव बरा" ह्या सदरातून राबवणार आहोत. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, महानगरे, दक्षिण, मध्य, वा उत्तर भारतीय राज्ये वगैरे वेगवेगळ्या परिसरांत लहानपण गेलेल्या लोकांना अशाच इतरांची ओळख करून देण्याचा हा प्रयत्न असेल. ह्या उपक्रमाची तपशीलवार माहिती आणि नागपूरकर शेजाऱ्यांची ओळख ह्या अंकातून करून देणार आहोत. ह्या उपक्रमाला तुम्ही भरभरून प्रतिसाद द्याल अशी आशा करतो.

# बाल्टिमोर मराठी मंडळ
# मैत्र

## संपादकीय

**ह्या अंकात...**



- सुनंदा काकडेलिखित कविता "पश्चिमी वसंत", रांगोळी चित्र व विचार......
- मेरीलँड राज्याच्या सीमा कशा ठरल्या? वाचा रोहित कोल्हटकरलिखित लेखात.....
- बाल्टिमोर मराठी शाळेबद्दल माहिती वर्षा डोंगरेंच्या शब्दांत.....
- "गड्या आपला गाव बरा" ह्या सदराअंतर्गत काही नागपूरकरांची ओळख....
- पवन बेंगेरीलिखित इंग्रजी कविता "Dreams" .....
- अथर्व बेंगेरीने काढलेले चित्र......
- सपना औटे, आर्यन जाधव आणि विनी कोप्परपू ह्यांनी काढलेली छायाचित्रे....


एखाद्या विशिष्ट विषयाची सखोल माहिती देणारी लेखमाला वा एखादे सूत्र घेऊन त्यावर सदर चालवावे असाही विचार आहे. तुम्ही अशा प्रकाराचे लेखन देऊ शकत असाल तर आम्हाला जरूर कळवा. प्रासंगिक लेखन, उदाहरणार्थ– बाल्टिमोर मराठी मंडाळाच्या  च्या विविध उपक्रम/कार्यक्रमाबद्दल माहिती, बाल्टिमोर परिसरातील इतर संस्थ्यांनी राबवलेले उपक्रम व कार्यक्रमांचे अहवाल, औचित्यलेखन – उदाहरणार्थ विविध सण, दिन (मराठी भाषा दिन, महाराष्ट्र दिन, महिला दिन वगैरे), प्रसिद्ध व्यक्तींच्या जयंती–पुण्यतिथीनिमित्त माहिती, अशा लेखनाचेही स्वागत आहे.

सर्वांना नवीन वर्षाच्या आणि महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! नवीन वर्षांमध्ये "मैत्र"च्या पुनरागमनामध्ये सहभागी होण्याचा संकल्प जरूर करा. तुमच्या लेखनाच्या प्रतीक्षेत आहोत.

– संपादक मंडळ


## प्रायोजक




IndiSoft



**सुनंदा काकडे**

‘पश्चिमी वसंत’ ही एक माझी जुनी कविता. काही वर्षापूर्वी हे गाणे लिहून चालीवर म्हटले होते मिनिसोटात, तिथल्या मराठी असोसिएशनच्या ‘वसंतबहार’ नावाच्या वार्षिक पाडव्याच्या उत्सवासाठी, ते आठवले....

**पश्चिमी वसंत**

आला, आला हो
आला हो, आला
वसंत ऋतू आला हो
ऋतुराजा आला ।।
आली वर्षप्रतिपदा
जागवीत रूपगंधा
कोंब कोवळे फुटले
ईस्टर लिलीला ।।ध्रु ।।

थंडी होती कडाक्याची
गोठलेला आसमंत।
एक म्हातारा हिवाळा
सृष्टी त्याच्या तडाख्यात।।
दीर्घ रात्री अंधारात
वृक्ष उभा एकला।
पक्षी सोडून उडून गेले
दूर दक्षिणेला।।१।।

मोहरता सफरचंद ,
लेते माणिक् मोती चेरी।
लायलाक बहरली
गंधवती नीलांबरी।।
ससे आले चपळ भारी
हरीण उड्या टाकायला ।
रॉबिन देई ललकारी
मंजुळ स्वागताला ।।२।।

नदी नाले वितळले
खळाळले पुन्हा पाणी।
हंसपक्षी तरंगती
पिल्लांसवे तळ्यातुनी।।
लाटासवे होडी झुले
मासोळीशी खेळायला।
आतुरली वॉटर स्की
जोषात् पाणी कापायला ।।३।।



यंदाच्या बाल्टीमोर मराठीमंडळात चैत्री पाडवा व होळीच्या एकत्र कार्यक्रमासाठी मी उत्साहाने गणेश टेबलावर एक रांगोळी काढली. त्या चित्रात इथली वासंतिक फुले चितारली. पण मधली डॅफोडिल्स व ट्युलिपची फुले काढेपर्यंत मला बराच वेळ लागला व उशीर झाला म्हणून पटकन दोन्ही बाजूला चेरी ब्लॉसमच्या फांद्या काढल्या. गाण्याचा नवरस कार्यक्रम खूप मस्त रंगला. आयोजकानी व स्वयंसेवकानी खूप परिश्रम घेतलेले सर्व ठिकाणी जाणवत होते. त्या बद्द्ल मंडळाच्या WhatsAppवर प्रेक्षकानी खूप कौतुकाचे छान अभिप्राय लिहिले. आणि माझ्या रांगोळीचेही त्यात उल्लेख होते. खास करून मेरिलंडच्या फुलांची म्हणजे ‘ट्यूलिप व मॅग्नोलिया’ यांची निवड विशेष उल्लेखनीय वाटल्याचे लिहिले होते. ते वाचून मी तर मनोमन खजीलच झाले. बापरे, म्हणजे माझी चेरीची फुले आता मॅग्नोलियासारखी दिसू लागली की काय? अहो, आता वयोमानाप्रमाणे व संधिवातामुळे बोटे, हात पूर्वीसारखे लवचिक व आर्टिस्टिक नाही राहिले ते मान्य पण ही तर फजितीच झाली. जर मिनिसोटातले माझे वरचे गाणे पाहिलेत तर त्यात मॅग्नोलियाचा कुठे उल्लेखही नाही. त्याचे कारण म्हणजे मिनिसोटाचा कडक ‘ओल्ड मॅन विंटर’ मॅग्नोलियाला मानवतच नाही. मी तर आतापर्यंत फक्त एक दोनदा पूर्वी डीसीत आल्यावेळी मॅग्नोलियाचे वैभव अगदी ओझरतेच पाहिले होते. मोठमोठे सुबक कळे व काहीशी कमळाच्या फुलासारखी डौलदार, निष्पर्ण शुष्क फांद्यावर मस्त सरळ उभे राहून उमलणारी गुलाबी जांभळी भपकेबाज फुले ही तर मेरीलंडची खासियत! तेंव्हा आता मी ठरवले आहे की पुढील वर्षी रांगोळी मुद्दाम मेरीलंड मॅग्नोलियाचीच काढायची. मात्र तोवर हातातून आता निसटत असलेल्या आय–हँड कोऑर्डीनेशनचे काय होईल कोण जाणे! प्रॅक्टिस केली पाहिजे, नाही तर मग तेंव्हा ती ‘चेरीची फुले’ वाटून ती काढल्याबद्दल कौतुकाच्या अभिप्रायांचे ओझे पुन्हा ओशाळे हासत पेलायची पाळी यायची! तर आतापासूनच प्रॅक्टीसला लागावे नाही का?

सौ वर्षा डोंगरे
मराठी शाळा प्रतिनिधी



# बाल्टिमोर मराठी शाळा

साता–समुद्रापार वसलेल्या नव्या पिढीला आपली मातृभाषा लिहिता–वाचता यावी हे ध्येय ठेवून बाल्टिमोर मराठी मंडळाच्या माध्यमातून मराठी शाळेची स्थापना एप्रिल २०१६ मध्ये झाली. आपल्या नव्या पिढीला मराठी संस्कृतीचे आणि मराठी इतिहासाचे महत्त्व कळावे ह्या हेतूने मराठी शाळेची सुरवात झाली.

बृहन् महाराष्ट्र मंडळ आणि भारतीय विद्यापीठ यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमानुसार मराठी शाळेमध्ये मुलांना लिहायला आणि वाचायला शिकवले जाते. दर दुसऱ्या शुक्रवारी Veterans Elementary School, एलिकॉट सिटी, मेरीलँड येथे संध्याकाळी ६:३० ते ८:३० शाळा भरवली जाते. १२० तासांच्या अभ्यासानंतर विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी पात्र होतो. तोंडी आणि लेखी असे परीक्षेचे स्वरूप आहे. मराठी शाळेसाठी ही एक महत्वाची पायरी आहे. ह्यावर्षी इयत्ता पहिली आणि इयत्ता दुसरी असे दोन वर्ग भरवण्यात येत आहेत. जून २०१७ साली भारती विद्यापीठातर्फे पहिली परीक्षा घेण्यात आली. एकूण १० विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये भाग घेतला होता.

मराठी शाळेमध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रमही केले जातात. मुलांना मराठी श्लोक, प्रार्थना, स्तोत्रपठण देखील शिकविले जाते. लहान मुलांना वेगवेगळ्या गोष्टी सांगून, चित्रे दाखवून बोलते कसे करता येईल याकडे लक्ष दिले जाते. मुलांना आपली संस्कृती जपता यावी, त्यांना मराठी सणवार भारतीय पद्धतीने साजरे करता यावेत यासाठी आपले सगळे सण (दिवाळी, दसरा, संक्रान्त, गुढीपाडवा, गणपती) शाळेत साजरे केले जातात. दिवाळीत बाल–विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रमात आणि नाटकात सहभाग घेतात. २०१७ आणि २०१८ साली वाद्य–वादकांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी समूह–गायनामध्ये सहभागही घेतला होता. तसेच २०१८ साली "जलपरी" ह्या नाटकाच्या माध्यमातून लहान मुलांनी आपली कला प्रदर्शित केली होती. मराठी शाळेतील मुलांनी फेब्रुवारी २०१९ मध्ये, श्री गणेश जयंती आणि वसंत पंचमीच्या दिवशी गणेश मंदिरात गणपती अथर्वशीर्षाचे सलग दोन तास पठण केले. मराठी भाषेबरोबर संस्कृत भाषाही समजून घेण्याचा प्रयत्न मुले करत आहेत. मराठी भाषेच्या माध्यमातून मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून शाळा नेहमी तत्पर असते.

मराठी शाळेबद्दल अधिक माहितीसाठी पुढील पत्यावर संपर्क करावा – baltimoreshalainmd@gmail.com. तसेच, baltimoremarathimandal.org ह्या संकेतस्थळाला जरुर भेट द्यावी. आज मराठी शाळेची एक प्रतिनिधी म्हणून हा लेख लिहीताना मला खूप अभिमान वाटत आहे. मी जानेवारी २०१७ पासून शाळा प्रतिनिधी म्हणून मराठी शाळेत शिकवत आहे. मुलांची प्रगती पाहून तसेच मुलांना मायबोलीप्रति आवड आणि आदर निर्माण होत आहे हे पाहून त्यांना शिकवण्याची उमेद वाढत आहे.





बाल्टिमोर मराठी मंडळ
जिव्हाळा, आपुलकी आणि सहकार्य

# बाल्टिमोर मराठी मंडळ
# मैत्र




सपना औटे


**मी एक हौशी छायाचित्रकार आहे. निसर्ग नेहमी सुंदर असतो, हे माझे मानणे आहे. Lake Elkhorn चे ऋतु आपणास हेच दर्शवतील.**




निळे आकाश, शांत तळे...
पुस्तकाचा आनंद घेण्यास परिपूर्ण सेटिंग!




पावसाने दिली या छायाचित्राला
रंगाची एक आकर्षक उधळण




पांढराशुभ्र हा फुलोरा, देई वसंताची चाहूल
वाटे शांत नि निवांत, इथे दोन क्षण विसावता




या गोठलेल्या तळ्यावर स्लाईड आणि
स्केट करायला किती धमाल येईल ना!

ह्या अंकापासून "गड्या आपला गाव बरा" हे सदर सुरू करत आहोत. मराठी बाल्टिमोरवासीयांची एकमेकांशी ओळख व्हावी, त्यांच्यातील स्नेह वृद्धिंगत व्हावा, हा ह्या सदराचा उद्देश. सुरुवातीच्या काही अंकांमध्ये आपल्या शेजाऱ्यांपैकी काहींची महाराष्ट्रातील प्रांतांनुसार ओळख करून घेऊ. आपल्या गावा/शहरातील इतर लोकांच्या ओळखींमधून मैत्रीचे नवे धागे जुळतील आणि जुने धागे बळकट होतील अशी आशा करतो. ह्या अंकामध्ये नागपूर शहरामध्ये वाढलेल्या, तिथे अनेक वर्षे राहिलेल्या, त्या शहराशी लागेबांधे असलेल्या आपल्या काही शेजाऱ्यांची ओळख करून घेऊ.

नागपूरकरांनी कमी कालावधीत उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. पुढील अंकामध्ये मराठवाड्यातील लोकांची ओळख करून देण्याचा विचार आहे. तुमचे बालपण मराठवाड्यात गेले असेल, वा शिक्षण/नोकरी वगैरे निमित्तांनी तुम्ही काही वर्षे मराठवाड्यात घालवली असतील, तुम्ही स्वतःला मराठवाड्याचे मानत असाल तर पुढील अंकामध्ये तुमची ओळख करून द्यायला आम्हाला आवडेल. संपादक मंडळाच्या पत्त्यावर (editor@baltimoremarathimandal.org) आम्हाला जरूर संपर्क करा.

## 'गड्या आपला गाव बरा'– आम्ही नागपूरकर



विकास आणि स्मिता दाणे

### विकास आणि स्मिता दाणे

- दोघेही नागपूरचे. गेली ४० वर्षे अमेरिकेत आणि बाल्टिमोर परिसरात वास्तव्य.
- सध्या Perry Hall परिसरात राहतात.
- विकास काका हे फार्मासिस्ट आणि स्मिता काकू लॅब केमिस्ट म्हणून काम करतात.
- नातवंडांबरोबर वेळ घालवणे हा त्यांचा सध्याचा आनंदाचा विषय. त्याच बरोबर संगीत, क्रिकेट, आणि फुटबॉल ह्यांची आवड आहे. काका तबला उत्कृष्ट वाजवतात.
- अजूनही नागपूर मधील मित्रपरिवार,आठवणी, आणि रहाणीमानाविषयी आत्मीयता.



समीर, मीनल, आणि रिया डाबरे

### समीर आणि मीनल डाबरे

- समीर नागपूरचा तर मीनल वर्ध्याची.
- समीर २००२ पासून अमेरिकेत, बाल्टिमोर परिसरात २००८ पासून वास्तव्य.
- समीर आणि मीनल दोघेही IT क्षेत्रात काम करतात.
- क्रिकेट, Poker, आणि परिवारासोबत वेळ घालवणे हे समीरचे आवडीचे छंद. मीनलला नाटकात काम करायची आवड आहे.
- नागपूरमधील तेलंखेडी येथील हनुमान मंदिर हे समीरचे अजूनही आवर्जून भेट देण्याचे ठिकाण. तेथील सामोसा–चाट हा आणखीनच जिव्हाळ्याचा विषय.

## 'गड्या आपला गाव बरा'– आम्ही नागपूरकर



ज्योती रेगे आणि नातू वीर

### ज्योती रेगे

- ज्योती काकू खरे म्हणजे नागपूरच्या, परंतु अमेरिकेत येण्याआधी त्या मुंबईकर होत्या.
- शिक्षण आणि नोकरी मिळून त्यांनी तब्बल बावीस वर्षे नागपूरमध्ये होत्या.
- गेल्या १० वर्षांपासून त्या अमेरिकेत रहात आहेत.
- निवृत्तीपूर्वी Pathology क्षेत्रात काम.
- अजूनही नागपूरमधील मित्रमंडळींची त्यांना खूप आपुलकी आहे. मित्रमंडळींना भेटायला त्या नागपूरला आवर्जून चक्कर टाकतात.



रोहित, विदुला, आणि सान्वी कोल्हटकर

### रोहित कोल्हटकर

- रोहितचे शिक्षण नागपूरमध्ये.
- २००० साली उच्च–शिक्षणासाठी म्हणून अमेरिकेत. Detroit–Baltimore–Chicago–Baltimore असा अमेरिकेतील प्रवास. सध्या इलिकॉट सिटी मध्ये स्थायिक.
- Pharmaceutical Research क्षेत्रातील काम.
- नागपूरसारखी पाणीपुरी कुठेही मिळत नाही आणि Florida and California च्या संत्र्याना नागपूरच्या संत्र्याची चव नाही असे काही ठाम समज. नागपूरमधील हल्दीरामच्या पहिलया उपहारगृहात मिळणारा डोसा अजूनही मनात घर करून आहे.
- संगीताची आवड, विरंगुळा म्हणून बासरी वाजवायला आवडते.



रोहित कोल्हटकर

# चारही दिशा चीत पण आपला मेरीलँड फिट !!

मी गेली अनेक वर्षे अमेरिकेत स्थायिक आहे. अमेरिकेतील विविध राज्यांतून प्रवास करताना मला नेहमी आश्चर्यचकित करणारा विषय म्हणजे इथल्या राज्यांच्या सीमा. अमेरिकेतल्या बऱ्याच राज्यांच्या सीमा सरळ रेषेत आहेत. पश्चिमेकडील राज्यांकडे नजर टाकली तर ही गोष्ट आणखी प्रकर्षाने जाणवते. दोन वर्षांपूर्वी 'व्हर्जिनिया' (Virginia) राज्यामधील Williamsburg या गावात जाण्याचा योग आला. त्या गावामध्ये फिरताना साहजिकच थॉमस जेफरसन (Thomas Jefferson ) यांचा उल्लेख जागोजागी येत होता आणि एक गोष्ट लक्षात आली की त्याकाळीसुद्धा थॉमस जेफरसन यांनी व्हर्जिनिया राज्य आणि एकूणच त्या प्रदेशाची भौगोलिक दृष्ट्या माहिती मिळवण्यासाठी भरपूर प्रयत्न केले होते. ह्या माहितीचा त्या वसाहतीच्या सीमा ठरवण्यात बहुमूल्य उपयोग झाला. तेंव्हाच मनात प्रश्न पडला की आपल्या मेरीलँड (Maryland) राज्याच्या सीमा कशा ठरल्या असाव्या? खरं म्हणजे असे अनेक प्रश्न मला पडतात आणि काही दिवसात कामाच्या व्यापामध्ये ते विसरले जातात. योगायोगाने काही दिवसांनी लायब्ररीमधे पुस्तके चाळत असताना एक छान पुस्तक हाती लागले आणि त्या प्रश्नाची आठवण झाली. त्या पुस्तकाचे नाव आहे 'How the States Got Their Shapes' by Mark Stein. ह्या पुस्तकात प्रत्येक राज्याच्या सीमांबद्दल व्यवस्थित तपशीलवार माहिती दिली आहे. आपल्या मेरीलँड (Maryland) बद्दलची माहितीही गमतीदार आहे. ती वाचल्यावर 'चारही मुंड्या चीत' म्हणतात तसे मेरीलँडला 'चारही दिशा चीत' असे म्हणावेसे वाटते.

अमेरिकेतील पहिल्या १३ वसाहतींबद्दल माझी कल्पना अशी होती की जशा जशा वसाहती स्थापन होत गेल्या तशा तशा त्यांच्या हद्दी घडत गेल्या. आणखी एक ढोबळ तर्क असा की नैसर्गिक आणि महत्त्वपूर्ण खुणांनुसार भौगोलिक सीमा पडल्या असाव्या. काही अंशी हे तर्क बरोबरही आहेत. उदाहरणार्थ मेरीलँड ची दक्षिण सीमा ही बहुतांशी 'चेसपिक बे' (Chesapeake bay) आणि 'पोटोमॅक' (Potomac) नदी अशा नैसर्गिक पद्धतीने घडलेली आहे. परंतु आपल्या राज्याच्या सीमेबद्दलच्या बऱ्याच गोष्टी मला बुचकळ्यात सुद्धा टाकतात. उदाहरणार्थ मेरीलँड राज्याची पूर्वसीमा. ही सीमा बहुतांश भागात एक सरळ उभी रेष ओढावी अशी आहे. आणखीन एक मजेदार गोष्ट म्हणजे 'डेलमारवा' (Delmarva) ह्या चेसिपिक बे आणि अटलांटिक महासागर ह्यांच्यामधील द्वीपकल्पातील (penninsula मधील) बरोबर एक काटकोन-त्रिकोणी भाग मेरीलँड मधून वगळला गेला आहे. हा भाग म्हणजे 'डेलावेर' (Delaware) हे राज्य होय. मेरीलँड ची उत्तर सीमा ही बरोबर सरळ आडव्या रेषेत आहे, पण त्या रेषेमुळे एके ठिकाणी राज्याचा काही भाग इतका अरुंद झाला आहे की राज्याचे दोन तुकडे केल्यासारखे वाटतात.

आता मेरीलँड ला चारही दिशा चीत म्हणण्याचे संदर्भ सांगतो. पूर्व, पश्चिम, उत्तर, आणि दक्षिण अशा चारही दिशांच्या सीमांबद्दल मेरीलँडला पराभव पत्करावा लागला आहे. उत्तर सीमेवरील पराभव त्यातल्यात्यात समजायला सोपा. चार्ल्स राजाच्या आदेशावरून १६३२ साली नवीन जगात इंग्लंडमधल्या कॅथलिक लोकांना स्थान मिळावे म्हणून मेरीलँड ची निर्मिती झाली. कालांतराने १६८२ साली विल्यम पेन (William Penn) ला मेरीलँडच्या उत्तरेला वसाहत स्थापन करण्यास सांगण्यात आले. ही वसाहत म्हणजेच पेनसिल्वेनिया (Pennsylvania). त्यानुसार ४० उत्तर अक्षांश ही मेरीलँड आणि पेनसिल्वानिया या दोन्ही वसाहतींची हद्द ठरवण्यात आली होती. परंतु William Penn यांच्या नकाशामधे ४० उत्तर अक्षांश चुकून दक्षिणेला काढण्यात आले होते. ह्या चुकीच्या नकाशामुळे पेन आणि मेरीलँड ह्यांच्या मधे वाद उद्भवला.




त्यात आणखी भर म्हणजे खरी ४० उत्तर अक्षांश रेषा ही पेन ह्यांनी ठरवलेल्या फिलाडेल्फिया (Philadephia) ह्या त्यांच्या वसाहतीच्या राजधानीमधून जात होती. अर्थातच फिलाडेल्फियासारखे शहर मेरीलँडला स्वाधीन करणे पेन आणि त्यांच्या वसाहतीला मान्य नव्हते. हा मेरीलँडचा उत्तर सीमा वाद बरीच वर्षे चालू होता. जवळपास ५० वर्षांनंतर. म्हणजे १७३२ साली, पूर्वेकडील सीमेचा वाद टाळण्याच्या संदर्भात मेरीलँडचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड बाल्टिमोर ह्यांनी माघार घेऊन पेनसिल्वेनियाच्या मागणीला मान्यता दिली खरी पण त्या ठरावात आपण पूर्वेकडील आणि उत्तरेकडील दोन्ही बाजूने जागा गमावून बसलो ही चूक लक्षात आल्यावर त्यांनी परत वाटाघाटी सुरु करण्याची मागणी केली. अर्थातच दातओठ खात बसण्याशिवाय मेरीलँडच्या वाट्याला काहीही आले नाही. अखेर १७६३ मधे चार्ल्स मेसन (Charles Mason) आणि जेरेमाया डिक्सन (Jeremiah Dixon) या दोन तज्ज्ञांच्या कमिशनने पेनसिल्वेनियाची पाठराखण करत उत्तर सीमेवरती शिक्कामोर्तब केले. हीच ती मेसन डिक्सन लाईन. ह्या रेषेमुळे एके ठिकाणी मेरीलँडचा प्रदेश इतका लहान झाला की त्याचे दोन तुकडे पडल्यासारखे वाटतात.

आता पूर्व सीमेवरती मेरीलँडला माघार का घ्यावी लागली ते पाहूया. ह्या इतिहासात डेलावेरच्या निर्मितीचाही इतिहास दडलेला आहे. थोडक्यात म्हणजे, मेरीलँडची वसाहत स्थापन झाली तेंव्हा चेसपीक बे च्या पूर्वेला म्हणजेच 'डेलमारवा' ह्या द्वीपकल्पावर डच लोकांच्या वसाहती होत्या. मेरीलँडच्या निर्मितीनंतर ४० वर्षांनी इंग्लंडने डच लोकांना हद्दपार केल्यावर तो भाग कोणी घ्यायचा हा वाद उत्पन्न झाला. अर्थातच, मेरीलँड आणि पेनसिल्वेनिया ह्या दोघांनीही त्यावर दावा टाकला. भौगोलिक दृष्टीने विचार करता ह्या भागाचा मेरीलँड मधे समावेश करण्यात काहीच हरकत नव्हती. मात्र ह्या भागात पूर्वीपासून राहणाऱ्या प्रोटेस्टंट पंथीयांनी मेरीलँडमधल्या कॅथलिक लोकांमध्ये सामील होण्यास नकार दिला. त्यावेळचा इंग्लंडचा राजा प्रोटेस्टंट असल्यामुळे त्याने प्रोटेस्टंट लोकांची बाजू घेऊन हा भाग पेनसिल्वेनिया वसाहतीला भाडेतत्वावर दिला. ह्या निर्णयाविरुद्ध मेरीलँड ने बरेचदा दाद मागितली. परंतु काही फरक पडत नव्हता. शेवटी मेरीलँड च्या गव्हर्नर लॉर्ड बाल्टिमोर ह्यांनी तडजोडीचा मार्ग स्वीकारला आणि 'डेलमारवा' ह्या द्वीपकल्पाचे साधारणतः दोन समान भाग करण्यात आले. त्याचीच एक उभी रेषा आपल्याला नकाशात दिसते. ह्या दोन भागांपैकी पश्चिमेचा भाग मेरीलँड ला देण्यात आला तर पूर्वेकडच्या भागाचे 'डेलावेर' हे राज्य तयार झाले. डेलमारवाचा भाग घेण्याच्या तडजोडीमध्येच लॉर्ड बाल्टिमोर ह्यांनी मेरिलँड ची उत्तरसीमा १५ मैल दक्षिणेकडे सरकावण्याचे मान्य करून बराच भूखंड गमावला. डेलमारवाचे दक्षिण टोक हे पहिल्यापासून व्हर्जिनियाचे असल्यामुळे तो भाग तसाच व्हर्जिनियाकडे राहिला. एकूण काय तर ह्या छोट्याशा द्वीपकल्पाचे तीन तुकडे तीन वसाहतींमध्ये विभागण्यात झाले.

आता राहिली दक्षिण आणि पश्चिम सीमा. ह्या सीमेंवरती मेरीलँडला व्हर्जिनियाची दादागिरी सहन करावी

लागली. आधी सांगितल्याप्रमाणे मेरीलँडची दक्षिण सीमा ही बहुतांशी पोटोमॅक नदीला लागून आहे. परंतु ह्या नदीला पश्चिमेकडे गेल्यावर दोन शाखा आहेत. अर्थातच आपल्याकडे जास्त भूभाग राहावा म्हणून उत्तरेकडील शाखा ही मेरीलँड ची सीमा ठरवावी हा व्हर्जिनियाचा युक्तिवाद तर दक्षिणेकडील शाखा मोठी असल्यामुळे ती मेरीलँडची सीमा ठरवावी असा मेरीलँडचा दावा होता. ह्या वादामध्ये प्रस्थापित व्हर्जिनियाने दादागिरी करून त्यांना पाहिजे ते मागणे रेटत नेले. हा वाद आत्ताआत्तापर्यंत म्हणजेच सन १९१० पर्यंत चालू होता. शेवटी सुप्रीम कोर्टानेसुद्धा व्हर्जिनियाच्याच बाजूने निर्णय दिला आणि त्यानुसार पोटोमॅक नदीची उत्तर शाखा ही मेरीलँडची हद्द असे ठरवण्यात आले. ह्या शाखेच्या उगमापासून उत्तरेकडे सरळ रेषेत ४० अक्षांशापर्यंत रेघ काढून मेरीलँडची पश्चिम सीमा मंजूर करण्यात आली.


मेरीलँड सीमेविषयी आणखीही बरेच काही बारकावे आहेत. पण एकंदरीत मेरीलँडला सर्व सीमेवरती येनकेन प्रकारेण पराभव पत्करावा लागलेला आहे. मात्र हे सगळे पराभव पत्करूनही मेरीलँड प्रगतीपथावर राहिले आणि आज ते देशातील सर्वात श्रीमंत राज्य आहे.



छायाचित्रकार
आर्यन जाधव



Title: Hiking the Potomac
Description: this is a photo taken while hiking the Maryland side of the Potomac river. The white clouds against the blue sky enhances the quality of this picture.



**‘Dreams’ Poem By: Pavan Bengeri**



## Dreams

Life is like a company
It can thrive with dreams of reaching higher
Or it can wither like a plant in a frier
It can soar high into the clouds
Or it can be covered like dead body's in shrouds


With dreams you can be successful
Or without them you can be stressful
With dreams you can have fun
Or you could be the ruined one

With dreams you could live a positive life
Or you could live with lots of strife
You could live like a king
Or not like anything

With dreams you can make improvement
Or without you will create no movement
With belief in your dream
You will gleam




‘घरापासून दूर घरी’ चित्रकार: अथर्व बेंगेरी



**‘El gato’ by:**

**विनी कोप्परपू**





Title: El gato

Description: The facial expression of a cat can tell you what he’s feeling, but the eyes of a cat can tell you what he’s thinking.